# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील संत मुक्ताई मंदिराच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१) २०१५६ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील संत मुक्ताई मंदिराचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुक्ताई मंदिराचे बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२८-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) संत मुक्ताई मंदिर, कोथळी, ता.मुक्ताई नगर, जि.जळगाव या तीर्थक्षेत्रास विकास कामांसाठी ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०१८ अन्वये रुपये ९०८.६७ लक्ष इतक्या रकमेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून प्रशासकीय मान्यतेची रक्कम रुपये ९०८.६७ लक्ष पूर्णतः जिल्हाधिकारी, जळगाव यांना वितरीत केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील तालुका स्तरावरील पंचायत समिती अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मंजूर करणेबाबत

**(२) २०८८६ (०८-०८-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तालुकास्तर पंचायत समिती येथे गट संसाधन केंद्र, राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामध्ये गट समन्वयक व समुह समन्वयक यांची कंत्राटी तत्वावर पद निर्मिती असून केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेतील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, स्वच्छ भारत मिशन, जलजिवन मिशन या महत्वाकांक्षी योजना गाव पातळीवर राबविण्याबाबत कार्य करीत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे माध्यमातून जिल्ह्याला व राज्याला निर्मल भारत अभियान, स्वच्छ सर्व्हेक्षण ग्रामीण, हागणदारी मुक्त अभियान, स्वच्छता ही सेवा, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल, स्वच्छता दर्पण व इतर सदरचे अभियान यशस्वीपणे राबविण्यामध्ये व राज्याला पुरस्कार मिळवून देण्यामध्ये या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्वाचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ११ मे, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सर्व योजनांचे एकत्रीकरण केलेले असून त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन व पाणी स्वच्छता कंत्राटी कर्मचारी यांना मिळणारे मानधन यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणे (समान काम-समान वेतन), स्थगित करण्यात आलेले १० टक्के मानधन वाढ अदा करणे, वैद्यकीय प्रसुती रजा व खर्च तसेच अपघात विमा लागु करणे, कंत्राटी रिक्त पदे भरणे व शासकीय सेवेत नियमित करणे इ. मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्र (पा.व स्व.) कंत्राटी कर्मचारी संघटना, नागपूर जिल्हा यांनी शासनास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील शासकीय कंत्राटी कर्मचारी यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०९-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार सदर पदे कंत्राटी स्वरुपात निर्माण करण्यात आली होती. तद्नंतर गट समन्वयक व समूह समन्वयक यांनी त्यांच्या सेवांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सदर पदे मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने अंतिम निर्णयापर्यंत सुरु ठेवण्यात आली असून, सद्य:स्थितीस त्यांच्या सेवा जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन कार्यक्रमांतर्गत घेण्यात आल्या आहेत.

सदर योजना ग्रामीण भागाशी संबंधित असून त्याची अंमलबजावणी ग्राम पंचायती द्वारे करण्यात येते. सदर योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे स्थानिक स्तरावर करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून प्रस्तुत कंत्राटी कर्मचारी कामकाज पार पाडतात.

(३) शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक ११/०५/२०२२ अन्वये राज्यातील ग्रामीण भागातील केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची जिल्हास्तरावर अंमलबजावणी एकाच यंत्रणेकडून प्रभावीपणे करण्यासाठी राज्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांची पुनर्रचना व बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाच्या एकूण ६ योजना अंमलबजावणीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. यामध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून स्वच्छ भारत मिशन व जल जीवन मिशन या योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे पदसिध्द कार्यकारी अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

तथापि, केंद्र शासनाने दिनांक २५/०१/२०१९ रोजी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या असून विहित कालावधीमध्ये उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक ०४/०९/२०२० अन्वये जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन वर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यानुसार जल जीवन मिशनची अंमलबजावणी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

शासन पत्र पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता राज्यातील सद्य:स्थितीत कार्यरत गट समन्वयक व समूह समन्वयक कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून मानधनामध्ये वाढ करून ते रुपये २५,०००/- या प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२३ पासून लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर पदांच्या मानधनात शासनाच्या दिनांक ०२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०१/०४/२०२३ पासून सुधारणा केली आहे. गट समन्वयक व समूह समन्वयक यांनी त्यांच्या सेवेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## राज्यात “स्वतंत्र आयुष मंत्रालय” स्थापन करण्याबाबत

**(३) २१०४९ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील विविध वैद्यकीय शाखांच्या वेगवेगळया समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने “केंद्र शासनाच्या धर्तीवर, राज्य शासनाचे स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्यात येईल” असे मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान यांचेतर्फे पुणे येथील आयोजित शासकीय कार्यक्रमामध्ये दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास माध्यमांसमोर सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात आयुर्वेद उन्नतीसाठी स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुष मंत्रालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, स्वतंत्र आयुष मंत्रालय किती कालावधीत स्थापन होईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२७-०६-२०२४) :** (१), (२) व (३) राज्यात आयुर्वेद संचालनालयाची स्थापना सन १९५७ साली झाली असून केंद्र शासनाने सन २०१२ मध्ये स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन केल्यानंतर राज्यात आयुर्वेद संचालनालयाचे आयुष संचालनालय असे नामकरण करण्यात आले आहे.

आयुष संचालनालयामार्फत राज्यात आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी या आयुष चिकित्सा पध्दतींमधील महाविद्यालयांमार्फत दर्जेदार पदवी- पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवून अर्हताधारक वैद्य, हकीम, डॉक्टर निर्माण केले जातात. आयुष महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांमार्फत दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. आयुष चिकित्सा पध्दतींच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरीता सामायिक प्रवेश कक्षासोबत समन्वय ठेवण्यात येतो. आयुष क्षेत्रातील संशोधनास व औषधी वनस्पतींची लागवड करण्याबाबत आयुष संचालनालयामार्फत प्रोत्साहन देण्यात येते. औषध निर्मितीसाठी नांदेड येथे रसशाळा चालविली जाते. याव्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'राष्ट्रीय आयुष मिशन' ची राज्यात अंमलबजावणी करण्यात येते. अशा रितीने आयुष संचालनालयामार्फत सक्षमरित्या कार्यवाही होत असल्यामुळे राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय अथवा विभाग स्थापन करण्याची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्य संस्थांची संख्या वाढवून कर्मचारी भरती करणेबाबत

**(४) २११६५ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्य संस्थांची संख्या वाढविणे व कर्मचारी भरती करणे यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासनाने सुधारित आराखडा जाहीर केला असून या आराखड्यानुसार सन १९९१ मधील लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यात २५२ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्यासाठी स्थान निश्चिती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहे जानेवारी, २०२३ पर्यंत राज्यात ४७ ठिकाणी प्रत्येकी ३० खाटांची ग्रामीण रुग्णालये स्थापन करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थान निश्चितीनुसार राज्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ अन्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात नवीन आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा निश्चित करण्यात आला.

सदर शासन निर्णयानुसार १९९१ च्या लोकसंख्येवर १९९७ मध्ये प्रसिध्द बृहत आराखड्यात स्थान निश्चिती करण्यात आलेल्या २५२ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी स्थापन न झालेली १०७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व नवीन १४७ प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेस शासनाने मंजुरी दिली.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात बृहत आराखड्यात शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ व दिनांक ०९ जून, २०१४ अन्वये राज्यात एकूण नवीन २७१ प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेस शासनाने मंजुरी दिली. त्यापैकी २२० प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता जागा प्राप्त होऊन १९२

प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बांधकामाकरीता अनुदान उपलब्ध झाले. तसेच अनुदान उपलब्धतेपैकी १५२ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बांधकाम ७५% पेक्षा जास्त पूर्ण होऊन १४४ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी पदनिर्मितीस शासनाची मंजुरी प्राप्त होऊन ९३ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित झालेली आहेत.
(४) कार्यवाही सुरु आहे.

---

## सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्यावतीने जाहीर केलेल्या आदर्श शिक्षक पुरस्काराबाबत

**(५) २११७८ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्यावतीने सन २०२२-२३ मध्ये आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रत्येक तालुक्यातून गुणांकनाने जादा असलेले दोन शिक्षकांचे प्रस्ताव मागविले होते, त्यानुसार खटाव पंचायत समिती शिक्षण विभागाने सर्व प्रस्तावांची वस्तुनिष्ठ तपासणी करुन गुणांकनात पुढे असणारे श्री.विनोद गोडसे ७४ गुण व श्री.ज्ञानेश्वर धायगुडे ६३ गुण हे दोन प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हास्तरीय गुणांकन समितीने दोन्ही प्रस्तावाची तपासणी करुन श्री. गोडसे ७० गुण व ज्ञानेश्वर धायगुडे ७३ गुण देऊन तालुकास्तरावर दोन्ही प्रस्तावांमध्ये ११ गुणांची तफावत असून प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी गुणांची कोणतीही पडताळणी न करता खटाव तालुक्यातील श्री.धायगुडे यांना कमी गुण असतानासूध्दा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०४-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

खटाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी २ प्रस्ताव सातारा जिल्हा परिषदेस सादर करण्यात आले होते.
(२) व (३) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२/१२/२००० रोजीचे परिपत्रकातील तसेच शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २८/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील विहीत केलेल्या निकषांनुसार सातारा जिल्हा परिषदेकडील कार्यरत शिक्षकांमधुन आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी पात्र शिक्षकांची निवड करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार तालुकास्तरावरुन जिल्हास्तरावर प्राप्त झालेल्या एकूण २१ प्राप्त प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीने छाननी करुन गुणांकन केले. यामध्ये खटाव तालुक्यातून श्री.धायगुडे यांना श्री.गोडसे यांचेपेक्षा जास्त गुणांकन मिळाले असल्याने श्री.धायगुडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपथी महाविद्यालयातील पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत

**(६) २१२०५ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण आणि संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या २७ शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपथी महाविद्यालये व रुग्णालयातील कुशल व अकुशल तसेच अर्धकुशल इत्यादी "क" आणि "ड" गटांतील ५०५६ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्त करण्यामुळे नियमित सेवा वेतन हमी सेवा हमी, सेवानिवृत्त वेतन हमी व सेवा सातत्य हमी यास तसेच यामुळे घटनात्मक आरक्षण न मिळाल्याने शासनाने सदरचा निर्णय तात्काळ रद्द करावा अशा मागणीबाबत शासकीय कर्मचारी संघटना तसेच बेरोजगार उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-०६-२०२४) :** (१) व (२) होय.

(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने दिनांक ३१/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्यांचा दिनांक ०६/०९/२०२३ रोजीचा शासन निर्णय रद्द केला आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (३) मध्ये ज्या विभागांनी/कार्यालयांनी दिनांक २१/१०/२०२३ पासून ९ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार नाही, अशा रितीने संपुष्टात आणाव्यात असे नमुद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागास अतिवृष्टी व पूरामुळे झालेल्या नुकसानीची दुरुस्ती करण्याकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) २१३५५ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागाने अतिवृष्टी व पूरामुळे दरवर्षी दुरुस्ती करण्याकरीता मागणी केलेला रुपये ४६२ कोटीचा निधी अद्यापही जिल्हा परिषदेला मिळाला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने नागपूर जिल्हा परिषदेला त्वरीत निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

अतिवृष्टी व पूरहानीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी "अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (३०५४-२९११)" सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून सन २०२२-२३ मध्ये रुपये ६.९० कोटी व सन २०२३-२४ मध्ये रुपये १४६.६२ कोटी रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. मात्र, सन २०२२-२३ मध्ये आर्थिक वर्षाच्या शेवटी वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे कोणत्याही जिल्ह्याला निधी देता आला नाही. तसेच सन २०२३-२४ मध्येही सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूरला तरतूदी अभावी निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.

(२) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या ४ वर्षांच्या कालावधीमध्ये नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते/पूलांच्या कामांसाठी खालीलप्रमाणे निधीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत :-

(रुपये लक्ष)

| योजनेचे नाव लेखाशीर्ष | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) | ८१२.१३ | ११२४.५४ | १००.०० | १८५०.०० |
| सर्वसाधारण जिवायो ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४-२२०३) | ३८००.०० | २३३४.९८ | २४.०० | ५०४.४४ |
| सर्वसाधारण जिवायो इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण (५०५४-४७११) | - | ११११५.०० | - | ६०.०० |
| आदिवासी जिवायो टीएसपी/ ओटीएसपी/ माडा (३०५४-०३६३/ ३०५४-०४०७/ ५०५४-०४०२) | ५२४.८० | ४९४.२० | ९६५.०० | ५६५.०० |
| आदिवासी राज्यस्तर ओटीएसपी (३०५४-२७२२) | - | - | ३०००.०० | - |
| नाविन्यपूर्ण योजना ३.५-४.५ % (३४५१-१८९३) | ४८७.०० | ६१.९० | ९८.८५ | १२.०० |
| मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना | - | - | १५४१.०० | ६७३६.०० |
| एकूण | ५६२३.९३ | ५१३०.६२ | ५७२८.८५ | ९७२७.४४ |

तसेच यापुढेही जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्ते/पूलांच्या कामांकरीता अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम व अन्य योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रुग्णवाहिका चालक, डॉक्टर व वैदयकीय तज्ञ यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(८) २१३६२ (०५-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २६ जानेवारी, २०१४ पासून महाराष्ट्र शासन व भारत विकास ग्रुप प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी मार्फत १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका वैद्यकीय सेवा राज्यात सुरू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०८ रुग्णवाहिका चालक व डॉक्टर यांना कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घ्यावे, समान काम समान वेतन देण्यात यावे, NRHM (राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान) मध्ये सामावून घेण्यात यावे, सर्व चालकांना व डॉक्टरांना शासनाकडून इन्शुरन्स देण्यात यावा यासह इतर अनेक मागण्यासंदर्भात शासनाकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०८-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकल्प हा सेवा पुरवठादारामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे रुग्णवाहिकांवर डॉक्टर व चालक यांची नियुक्ती सेवा पुरवठादाराव्दारे करण्यात येते, तसेच १०८ रुग्णवाहिकेवरील मनुष्यबळाचे मानधन, डॉक्टरांचा इंशूरन्स इ. बाबतचे नियोजन हे सेवा पुरवठादारामार्फत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील ६९ गावांसाठी नळपाणीपुरवठा करणाऱ्या योजनेच्या लेखापरीक्षणाचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत

**(९) २२३९१ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथील ६९ गावांसाठी नळपाणीपुरवठा करणाऱ्या योजनेकरीता शासनाने करोडो रुपयांचा खर्च केलेला असतानाही योजनेचा लाभ प्रत्यक्षात गावातील लोकांना मिळत नसून बांधकाम व्यावसायिक घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून योजनेच्या कामाबाबत तज्ञ अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत लेखापरीक्षण होणेबाबतची मागणी नागरिक अधिकार समितीने दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई तालुक्यातील ६९ गावांच्या पाणी पुरवठ्याचे काम सुरू करण्यासाठी शासनाने आतापर्यंत किती रक्कम खर्च केली आहे, तसेच प्रत्यक्ष झालेले काम व कामाची गुणवत्ता, नळपाणी योजनेमार्फत प्रत्यक्ष किती गावातील लाभार्थ्यांना पाणीपुरवठा करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाचा लेखापरीक्षणाचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास, दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२९-०८-२०२४) :** (१) होय, या आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) वसई विरार उप प्रादेशिक पाणीपुरवठा (६९ गावे) योजनेवर आतापर्यंत रुपये ९१२८.०० लक्ष इतका खर्च झाला असून, योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. सद्य:स्थितीत ६९ गावांपैकी ३५ गावांना या योजनेमार्फत पाणीपुरवठा सुरु आहे.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे ६९ गावांपैकी ५२ गावांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी वसई-विरार महानगरपालिकेने स्विकारली आहे. उर्वरीत १७ गावांकरीता जल जीवन मिशन अंतर्गत अर्नाळा व १६ गावे पाणीपुरवठा योजना (पुनर्बांधणी) मंजूर असून योजनेची ८२ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. सदरहू योजना तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील जे.जे. परिसरातील परिचर्या शिक्षण संस्थेच्या वसतिगृहामध्ये विविध सोयी सुविध उपलब्ध करुन देणेबाबत

**(१०) २२५१६ (०५-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण विभागाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामुळे परिचर्या शिक्षण संस्था अधिष्ठात्यांच्या ताब्यात गेल्यामुळे मुंबई येथील जे.जे.परिसरातील परिचर्या शिक्षण संस्थेच्या अडचणी वाढल्या असून गेल्या आठ महिन्यापासून या वसतिगृहाच्या साडेअकरा लाखाच्या थकित बिलामुळे बेस्टने वीज जोडणी खंडीत केली असल्याने येथील शिकाऊ परिचारकांवर रात्रभर अंधारात राहण्याची वेळ आल्याने संतापलेल्या ३०० शिकाऊ परिचर्यांनी शिक्षण संस्थेसमोर घोषणाबाजी करत आंदोलन केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी जे.जे.परिचर्या वसतिगृहात सोयी सवलती देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०६-२०२४) :** (१) व (२) परिचर्या शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असलेल्या विद्यार्थी वसतिगृहाचा विद्युत पुरवठा दिनांक ०९/१०/२०२३ रोजी सांयकाळी खंडीत केला असता दिनांक १०/१०/२०२३ रोजी संस्थेने रुपये ४,१२,९२५/- एवढया रकमेचा धनादेश विद्युत पुरवठा करणाऱ्या कंपनीला अदा करुन त्याच दिवशी दिनांक १०/१०/२०२३ रोजी पुरवठा सुरुळीत करण्यात आला. तसेच ऊर्वरित असलेले संपूर्ण प्रलंबित विद्युत देयके तातडीने अदा करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणतांबा (जि.अहमदनगर) येथील पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावाच्या पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) २३४९९ (२०-०७-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणतांबा-जळगाव (जि.अहमदनगर) या दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर चांगदेव नगर जवळील रेल्वेच्या भुयारी मार्गावर पुणतांबा गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावाची पाईपलाईन फुटल्यामुळे पुणतांबेकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईनची दुरुस्ती करुन कामाचा दर्जा सुधारून पुणतांबेकरांची पाणीटंचाई निवारण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणतांबेकरांची पाणीटंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव पाटील (३०-०८-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर पाईपाईन दुरुस्त करून गावास नियमित पाणीपुरवठा करून पाणी टंचाई दुर करणेत आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गेल कंपनीच्या पॉलीमर प्रकल्पामुळे स्थानिक मच्छीमारांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१२) २३५५० (१२-०६-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गेल कंपनीच्या पॉलिमर प्रकल्प उभारण्यासाठी यंत्रसामुग्रीची मोठ्या मालवाहू जहाजांतून वाहतूक अलिबाग आणि साखर येथील खाडीतून अचानक सुरू झाल्याने मच्छीमारांच्या जाळ्यांचे व बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग, आक्षी-साखर खाडीतून मालवाहू जहाजांची होणारी वाहतूक थांबविण्याबाबत तसेच सदर कंपनी विरोधात कारवाई करून नुकसान भरपाई देण्याबाबत मच्छीमार सोसायटीने मेरीटाईम बोर्डाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.संजय बनसोडे (२०-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अलिबाग मच्छिमार सहकारी सोसायटी लि. यांनी दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र सागरी मंडळाकडे दिलेल्या निवेदनद्वारे मागणी केली आहे.
(३) मच्छिमारांचे नुकसान होऊ नये याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन अलिबाग व आक्षी खाडीतून बार्ज वाहतूक करण्याबाबत स्थानिक मच्छिमार सोसायट्यांशी चर्चा करुन यथोचित निर्णयं घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) शहरातील नागझिरी नदीवरील पुलाच्या कामास मंजूरी देण्याबाबत

**(१३) २३७२४ (२०-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागझिरी (जि.जळगाव) शहरातील पुलाचे काम मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामास निधी उपलब्ध करून देवून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, सदर पूल तातडीने पूर्ण करणेकमी काय कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०४-०९-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील रावेर शहरातून जाणारा जुना सावदा रस्ता रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.८६ दर्जाचा आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.०/४०० येथे नागझिरी नदी आहे. सदर ठिकाणी सन २०२३-२४ मध्ये रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशीर्ष ३०५४-२४१९) अंतर्गत पुलाचे काम मंजूर करण्यात आले असून सदर काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुरवाडे-बोरगाव (ता.बोदवड, जि.जळगांव) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१४) २३७३५ (२०-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरवाडे-बोरगाव (ता.बोदवड, जि.जळगांव) येथील रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाचे काम करण्याऱ्या ठेकेदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०४-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महापे (नवी मुंबई) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा भूखंड मे. रूपा इन्फोटेक इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला बेकायदेशीर वाटप केल्याबाबत

**(१५) २४१११ (१७-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापे, नवी मुंबई येथील मिलेनियम बिझनेस पार्कच्या भूखंड क्र. जनरल-३१ मोजमाप ८३७९ हा भूखंड पार्किंगसाठी राखीव असतानासुद्धा या जागेवर आयटी/आयटीएस या प्रयोजनाकरीता कोणतीही निविदा न मागविता औद्योगिक विकास महामंहळाचे अधिकारी यांनी संगनमत करुन रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासकास सवलतीच्या दरात भूखंड दिल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान केल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी नियमांचे उल्लघन करुन वाटप केलेल्या भूखंडाचे वाटप रद्द करून संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.नारायण धर्मा डाऊरकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केली होती व यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारवाईचे आदेश असतानाही अद्यापपर्यंत बांधकामावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबई येथील मिलेनियम बिझनेस पार्कमधील भूखंड क्र.जनरल-३१ मोजमाप ८३६० हा भूखंड दिनांक ११/०७/१९६७ रोजी Shri.Narayandas Bhulchands & others यांना वाटप केला होता. परंतु त्यांनी विहित कालावधीत भूखंडाचा विकास न केल्याने सदरचा भूखंड पंचनामा करुन मऔवि महामंडळाने ताब्यात घेतला. तद्‌नंतर सदरचा भूखंड क्र. जनरल-३१ हा मिलेनियम बिझनेस पार्कमधील बिल्डींग पार्कींगसाठी राखीव ठेवण्यात आला होता. त्याकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सदरचा भूखंड क्र. जनरल-३१ हा इतर प्रयोजनासाठी अनआरक्षित ठेवण्यात आला. तद्‌नंतर M/S Rupa Infotech & Infrastrueture Pvt.Ltd. यांना सदर भूखंडाचे वाटप उद्योग विस्तारांतर्गत मऔवि महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार झाले आहे. त्यामुळे आर्थिक नुकसान झालेले नाही.
(२) व (३) श्री.नारायण धर्मा डाऊरकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ च्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणाच्या वस्तुस्थितीबाबतचा अहवाल मऔवि महामंडळाने दिनांक २४/०३/२०२३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. त्यानुसार M/S Rupa Infotech & Infrastrueture Pvt.Ltd. यांना दिनांक ०६/०३/२०२० रोजी भूखंडाचे वाटप मऔवि महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार शुल्क आकारुन करण्यात आले आहे. सदर भूखंडाचा ताबा दिनांक १८/०१/२०२२ रोजी देण्यात आला असून, प्राथमिक करारनामा दिनांक ०२/०३/२०२२ रोजी कार्यान्वित करण्यात आला आहे.

सदर उद्योग घटकास उद्योग विस्तारातंर्गत भूखंड वाटपास मऔवि महामंडळाच्या भूखंड वाटप समितीने (LAC) मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूरीच्या अनुषंगाने भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात आली असून, भूखंडाच्या संपूर्ण अधिमुल्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतर भूखंडाचा ताबा घटकास देण्यात आला आहे. तसेच M/S Rupa Infotech & Infrastrueture Pvt.Ltd. यांनी मऔवि महामंडळाच्या अभियांत्रिकी विभागाकडे दिनांक ०४/०१/२०२३ अन्वये माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारतीचे नकाशे मंजुरीसाठी सादर केलेले आहेत. सदर नकाशास अद्याप मंजूरी देण्यात आलेली नाही.

सद्य:स्थितीत सदर भूखंड संपूर्णपणे रिकामा असून, त्यावर कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नाही. त्यामुळे मऔवि महामंडळाकडून भुखंडवाटपाची कार्यवाही नियमोचित झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक विभागामध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत नळजोडणीची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१६) २४२९४ (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागामध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत अद्याप ४,५०,५०० नळजोडण्या अपूर्ण असून योजनेंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याची अंतिम मुदत माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत असतानाही सन २०२३-२०२४ या वर्षातील एकूण उद्दिष्टापैकी केवळ २९ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जल जीवन मिशन योजनेंतर्गत नळजोडण्याच्या कामास विलंब करणाऱ्या दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली, तसेच सदर नळजोडण्या विहीत कालावधीत पूर्ण होण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२७-०६-२०२४) :** (१) व (२) नाशिक जिल्ह्यात ७,१८,१५२ एवढी कुंटुंब संख्या असून, सन २०२३-२४ मध्ये १,४९,९४१ इतके नळ जोडणीचे उद्दिष्ट दिले होते. पैकी मार्च-२०२४ अखेरपर्यंत ५३,५६७ नळ जोडणीचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले असून, आतापर्यंत जून अखेरपर्यंत एकूण ६,२६,०५८ इतक्या नळ जोडणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ९२,०९४ नळ जोडणीचे उद्दिष्ट माहे सप्टेंबर, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथील आरोग्यवर्धिनी केंद्रांत मूलभूत वैद्यकीय सुविधा पुरविण्याबाबत

**(१७) २४२९८ (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी भागातील सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांना मूलभूत वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी नाशिक येथे ४६ आरोग्यवर्धिनी केंद्रांची माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सुरुवात करण्यात आली असून सदरील आरोग्यवर्धिनी केंद्रांत डॉक्टर, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून अनेक केंद्रे विनावापर पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरात आरोग्यवर्धिनी केंद्राप्रमाणेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही योजना राबवण्यात येणार असून हि योजना निधी व मनुष्यबळाच्या अभावामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्यवर्धिनी केंद्र व आपला दवाखाना योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण १०६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदीर (UHWC) मंजूर आहेत. त्यापैकी ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदीर केंद्र कार्यान्वित आहेत. उर्वरित ६० नागरी आयुष्मान आरोग्य मंदीर केंद्रे सुरु करण्याची प्रक्रिया महानगरपालिकास्तरावर सुरु आहे. सदर ६० नागरी आयुष्मान आरोग्य मंदीर यांच्या जागा निश्चित झाल्या असून त्यासाठी लागणारे औषधी, उपकरणे खरेदी प्रक्रिया महानगरपालिका स्तरावर सुरु आहे. तसेच मनुष्यबळ पदभरती प्रक्रिया निवडणुकीच्या आचारसंहितेनंतर करण्यात येणार आहे.

नाशिक शहरात एकूण २५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मंजूर असून १ कार्यान्वित करण्यात आले आहे व उर्वरित २४ दवाखाने सुरु करण्याची प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरु आहे. त्यापैकी १४ आपला दवाखाना यांच्या जागा निश्चित झाल्या आहेत व उर्वरित १० ठिकाणी पोर्टा केबिन संस्थापित करून कार्यान्वित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

आपला दवाखाना करीता लागणारे औषधी, उपकरणे खरेदी प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच मनुष्यबळ पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अद्ययावत आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली सुरु करण्याबाबत

**(१८) २४३१८ (०८-०८-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची नोंद ठेवणारी आरोग्य व्यवस्थापन माहिती संगणक प्रणाली माहे जून, २०२२ पासून बंद असल्याने नवीन संगणक प्रणाली येईपर्यंत रुग्णांच्या नोंदी कागदोपत्री ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून सदरील कागदोपत्री माहिती ठेवण्याचे काम गुंतागुंतीचे असल्यामुळे ओपीडी मधील रुग्णांची रीतसर माहिती सध्या उपलब्ध होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेल्या एनआयसी या प्रणालीमध्ये अनेक तांत्रिक त्रुटी असल्यामुळे डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी मोठी गैरसोय होत असून रुग्ण सेवेकडे दुर्लक्ष होत असल्याने आरोग्य व्यवस्थापन माहिती संगणक प्रणाली बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मध्यंतरीच्या काळातील रुग्णांच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी तसेच नवीन प्रणाली वापरण्यास सोपी करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) एनआयसी चे Nextgen eHospital ही संगणक प्रणाली सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर जिल्हा रुग्णालय, पुणे व जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करण्यात आलेली आहे, सदर संगणक प्रणालीमध्ये काही तांत्रिक त्रुटी असल्यास त्या एनआयसी मार्फत सोडविल्या जातात.
(३) एनआयसी चे Nextgen eHospital ही संगणक प्रणाली सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर आलेली असल्याने त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील रासायनिक कंपनीत झालेल्या स्फोटामुळे कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१९) २४३६३ (१८-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्यौगिक विकास महामंडळाच्या फेज २ मधील अमोघन या रासायनिक कंपनीत झालेल्या बॉयलरच्या स्फोटांमुळे लागलेल्या आगीत सुमारे २० कामगारांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना माहे मे, २०२४ मध्ये वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंपनीत सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना कार्यान्वित नसून कंपनीत बॉयलरसाठी कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली, तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे (०४-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, डोंबिवली या कारखान्यात दिनांक २३ मे, २०२४ रोजी रिॲक्टरमध्ये तापमान व दाब वाढले. त्यामुळे रिॲक्टरचा स्फोट होऊन १३ कामगारांचा मृत्यू झाला व ६७ व्यक्ती जखमी झाल्या आहेत.
(२) सदर अपघाताच्या चौकशीमध्ये आढळून आले की कारखान्यात केल्या जाणाऱ्या उत्पादन प्रक्रियेत रिॲक्टरमध्ये होणाऱ्या अभिक्रियेदरम्यान अचानक वाढणाऱ्या तापमान व दाब याबाबत, रिॲक्टरमध्ये सल्फ्यूरिक ॲसिड व इतर कच्चा माल नियंत्रित पध्दतीने टाकण्याकरीता फ्लो कंट्रोल व्हॉल्व किंवा ऑन-ऑफ व्हॉल्व्ह रिॲक्टरवर बसविले नव्हते व ते तापमान वाढल्यास कच्चा माल टाकण्यास प्रतिबंध करणारी इंटरलॉक व्यवस्था नव्हती.

तसेच, रिॲक्टरवर युटिलिटी फेल्युअर अलार्म, ॲजिटेटर फेल्युअर अलार्म, उच्च तापमानाचा अलार्म, नियंत्रित दराने ॲडीशन न झाल्यास त्यासाठी अलार्म बसविले नव्हते.

सदर कंपनीत कोणतेही नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत बाष्पके वापरण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून कारखाने अधिनियम, १९४८ च्या विविध तरतुदींच्या भंगाकरीता अमुदान केमिकल्स प्रा. लि. या कारखान्याचे भोगवटादार यांचे विरुध्द ०९ खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

तसेच अमुदान केमिकल्स प्रा.लि., डोंबिवली या कारखान्याचे वर्षे २०२५ पर्यंत नुतनीकरण केलेला परवाना रद्द करण्यात आला आहे.

या प्रकरणी मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २४/०५/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली होती. तद्नंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण यांनी दिनांक १४/०६/२०२४ रोजी जामीन मंजूर केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मे.अमुदान केमिकल्स प्रा.लि., या कारखान्याला दिनांक २३/०५/२०२४ रोजी उद्योग बंद बाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहे.

सदर अपघातानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात येणाऱ्या संमतीपत्राचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर उद्योग बंदचे आदेश पारीत केले आहेत.

अपघातातील १३ मृत कामगारांपैकी २ मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रत्येकी रुपये ५ लाख अदा करण्यात आले आहेत. उर्वरीत ११ मृत कामगारांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये याप्रमाणे एकूण ५५ लाख रुपये जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

तसेच एकूण १३ मृत कामगारांपैकी १२ कामगारांच्या वारसांना राज्य कामगार विमा योजना कार्यालयामार्फत नुकसानभरपाई मिळणेबाबतची कार्यवाही चालु आहे. उर्वरीत एका मृत कामगाराच्या वारसास नुकसानभरपाई मिळणेबाबत मा.नुकसानभरपाई आयुक्त यांना पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील आयुष्मान भारत योजनेंतर्गत गरजू रुग्णांना उपचार मिळण्याबाबत

**(२०) २४३७२ (०४-०७-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे साडेचार लाख नागरिकांना पंतप्रधान जन आरोग्य योजनेंतर्गत कार्ड वितरीत करण्यात आले असून सदर योजनेच्या संकेतस्थळावर सुमारे २०० रुग्णालयांची यादी देण्यात आली असून पाच लाख रुपये खर्चापर्यंतचे उपचार मोफत होणार असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संकेतस्थळावरील उक्त यादीत मुंबई, नवी मुंबई, ठाणे व रायगडमधील २८ रुग्णालयांचाही समावेश असतानाही नवी मुंबईतील श्री.बबनराव साळुंखे या रुग्णास बेलापूर ते दिघ्यापर्यंत (जि.ठाणे) सर्व

रुग्णालयांनी सदर कार्ड चालत नसल्याचे कारण देत उपचार करण्यास नकार दिला असून शासनाने एकाही रुग्णालयात या योजनेसाठी संगणीकृत नोंदणी (लॉगिंग) केलेले नसल्यामुळे या योजनेचा आणि कार्डाचा रुग्णांना फायदा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरीता होणाऱ्या खर्चाची विभागणी केंद्र व राज्य शासन यामध्ये ६०:४० या प्रमाणात करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयुष्मान भारत योजनेसाठी संगणकीय नोदणी (लॉगिंग) करणेबाबत तसेच गरजू नागरीकांना मोफत उपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०८-०७-२०२४) :** (१) खरे नाही.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दिनांक ०५ जुलै, २०२४ अखेर एकूण लाभार्थ्यांपैकी २.७८ कोटी लाभार्थ्यांच्या आयुष्मान कार्डचे निर्माण करण्यात आले आहे. राज्यातील आशा कर्मचाऱ्यांमार्फत पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डाचे वितरण करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीमध्ये योजनेंतर्गत ९९७ रुग्णालये (१९६ शासकीय व ८०१ खाजगी) अंगीकृत करण्यात आली आहेत. या सर्व रुग्णालयांची यादी योजनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विस्तारीत योजनेनुसार संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्यायावत करण्यात येते. तसेच दिनांक ०१/०७/२०२४ पासून एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमधुन पात्र लाभार्थ्यांना प्रति वर्ष प्रति कुटुंब रुपये ५ लक्ष मर्यादेत विनामुल्य उपचार अनुज्ञेय आहेत
(२) हे खरे नाही.

मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांमधील एकूण १३७ रुग्णालये योजनेंतर्गत अंगीकृत असून या रुग्णालयांमधून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.

नवी मुंबईतील श्री.बबनराव साळुंखे रुग्णास योजनेंतर्गत उपचार नाकारल्याची कोणतीही तक्रार राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयास अथवा योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या तृतीय पक्ष प्रशासक कंपनीकडे प्राप्त झालेली नाही. योजनेंतर्गत अंगीकृत सर्व रुग्णालयांना आवश्यक लॉगीन पुरविण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.
(३) खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.